चुटका

अर्धा तास झाला ते चुकीचं भाषण वाचताहेत ! निकोप राजकारणासाठ कबड्डीच्या खेळांची आवश्यकता असल्याचं ते पटवून देताहेत!!

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक ७ | १ मार्च २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

संपादक : खासदार राजू शेट्टी

शेतकरी संघटना

हल्लेखोरांना माफ केले,

अन् शेतकऱ्यांचा 'हीरो' झालो

खासदार राजू शेट्टी यांची खास मुलाखत

माझ्या भावंडांना शेतीचं अर्थकारण कळलं होतं, तेव्हा मला कळलं नाही. काळी माती आपली माय आहे. वडिलांनी शेतीसाठी हाडाची काडं केली. त्या शेतीपासून का दूर जायचं? माझं शेतीशी भावनिक नातं होतं. कुणाची गुलामगिरी करण्यापेक्षा उत्तम शेती करायचं ठरवलं. यशस्वी प्रयोगही केले. मात्र, हातात पैसा येत नव्हता. मी तोट्यात का? कुठं चुकलं ते कळेना? उत्तर शोधण्याचा प्रयत्न करीत असताना ऐके दिवशी शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचं भाषण ऐकलं. त्यांनी शेतीचं अर्थकारण सांगितलं. शेतकऱ्यांविषयी त्यांची तळमळ पाहून माझे डोळे पाणावले. यापुढेही शेतीच करण्याचा निर्धार करून मी शेतकरी संघटनेत दाखल झालो.

पान २० वर

शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प हवा

नुकताच कृषीमंत्री शरद पवार यांनी शेतीसाठी वेगळा अर्थसंकल्प गरज नसल्याचे वक्तव्य केले आहे. मात्र शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प पाहिजेच. देशातील ७० टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. रेल्वेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प आहे. मग शेतीसाठी का नको. वास्तविक केंद्र शासनाने शेतीसाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद तोकडीच आहे. प्रत्येक वेळी शेतीसाठी अत्यल्प गुंतवणूक करून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रयत्न केला जातो. शेतकरी हा केंद्र बिंदू मानून शेती, शेतकऱ्यांच्या विकासासाठी सरकारने आपली दालने अद्याप खुली केलेली नाहीत.

सन २००९ मध्ये केंद्र शासनाने ७२ हजार कोटी रूपयांची कर्जे माफ केली. त्यानंतर शासनाने मात्र शेतकऱ्यांकडे ढुंकूम देखील बघितलेले नाही. शेतकऱ्यांच्या विकासाची स्वप्ने पाहणारे राज्यकर्ते केवळ दिखाऊपणा करून त्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करत आहेत. शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प हवा अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने यापूर्वीच केलेली आहे. शेती व त्यावरील उद्योगावर कोट्यवधी जनता अवलंबून असताना शेतीसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प नसणे हे शेतकऱ्यांचे दुर्देव आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना शेतकरी विरोधी धोरणेच अवलबंले जात आहे. हजारो एकर शेती विकत घेऊन त्यामध्ये मोठे उद्योगधंदे उभारण्याचा घाट घातला जात आहे. सेझची नवी पध्दत अवलंबली जात आहे. त्यांना कायदा देखील स्वतंत्र आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करून त्यांना देशोधडीला लावण्याचे पाप राज्यकर्त्यांनी चालवलेला आहे. केंद्र शासनाचे अर्थसंकल्पीय सत्र सुरू झालेले आहे. एकीकडे टू जी २ लाख कोटीचा घोटाळा केंद्र सरकाराने मान्य केलेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, युवा नेते राहुल गांधी यांचे स्विस बँकेत खाती आहेत, असा आरोप होत आहे. युएलसी, राष्ट्रकुल, आयपीएल आदींचा कित्येक लाख कोटींचा घोटाळा भारतात सध्या झालेला आहे. तरीही शासन भ्रष्टाचारांचे पाठराखण करत आहेत. मात्र शेतीसाठी तरतूद करणे शदर पवार यांना शक्य नाही. महागाईमुळे शेतकऱ्यांना अजिबात फायदा झालेला नाही. मधले दलालच मोठे झालेले आहेत. शेतकऱ्यांच्या पदरात मात्र काहीच पडलेले नाही. जरा कुठे दर वाढले की सरकारी नोकरदार बोंब मारतात. त्यांचे गलेलठ्ठ पगार पाहिल्यावर शेतकऱ्यांचे डोळे चक्रावतात. महिन्याला लाख - लाख रूपये पगार दिला जातो. तरीही शेतकऱ्यांच्या विकासाचे स्वप्न पाहणारे स्वतंत्र अर्थसंकल्पाला विरोध का?

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

शेतकरी संघटना स्वाभिमानी

♦ वर्ष ६ ♦ अंक ७ ♦१ मार्च २०११ ♦ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
♦ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ♦ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
♦ **मानद सल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या.बी.जी.कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर
♦ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ♦ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✲खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

हल्लेखोरांना माफ केले, अन् शेतकऱ्यांचा 'हीरो' झालो

▶ पान १ वरुन

शेती हा वडिलोपार्जित व्यवसाय. शिरोळ (जि. कोल्हापूर) माझं गाव. आम्ही पाच भावंडं. मी शेंडेफळ. चार भावांनी शेतीकडे पाठ फिरवून नोकरीची वाट धरली. मी मेकॅनिकल इंजिनिअर होतो. भावांना मी शेतीऐवजी नोकरीच करावी, असं वाटत होतं. 'शेतीत अनेक अडचणी आहेत. पुन्हा विचार कर', असा सल्ला दिला. मात्र, मी हा सल्ला फे टाळला. भाऊ म्हणत असत, ''एक दिवस हा शेतीतून पळ काढेल.'' मी शेती करायला लागलो. काबाडकष्ट करूनही शेतीतून काहीच मिळत नाही, असं जेव्हा समजलं तेव्हा वेळ निघून गेली होती. शेतकरी संघटनेचा बिल्ला छातीवर चिकटला होता. घरच्यांना हे पटत नव्हतं. आपला हा मार्ग नाही. शेती कोण करणार, अशा प्रश्नांचा भडिमार केला. यावर मीच उपाय शोधला.

पहाटे लवकर उठून दुपारपर्यंत शेतीची कामे पूर्ण करीत असे. दुपारनंतर संघटनेच्या कामाला सुरवात केली. लोकांवर छाप पडावी असं माझं काही व्यक्तिमत्त्व नव्हतं. प्रारंभी कोणी दखलही घेत नसत. तरीही शेतकऱ्यांचे प्रश्न पोटतिडकीनं मांडण्याचा प्रयत्न करीत असे. शिरोळमधील साखर कारखान्याच्या भ्रष्टाचाराविरोधात वार्षिक सभेत आवाज उठविला. पुढे याच कारखान्याची निवडणूक लढविली. पराजय झाला. मात्र, खचलो नाही. २००१ मध्ये जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी झालो. २००२ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात ऊस दराचं आंदोलन पेटलं. त्या वेळी साखरसम्राटांच्या चेल्यांनी माझ्यावर जीवघेणा हल्ला केला. मी मृत्यूशी झुंज देत होतो. सुदैवानं वाचलो. पोलिसांनी हल्लेखोरांची नावे सांगण्याची विनंती केली. मात्र, मी एक महत्त्वाचा निर्णय घेतला. हल्ला करणाऱ्या नेत्यांच्या चेल्याविरोधात मी तक्रार करणार नाही. माझी लढाई व्यवस्थेविरोधात आहे. मी हल्लेखोरांना माफ करतो. या निर्णयानं माझ्याविषयी सहानुभूतीची लाट उसळली. मी रुग्णालयात असताना कोल्हापूर जिल्ह्यातील कारखानदारांनी एक ऐतिहासिक निर्णय घेतला. तो म्हणजे उसाला ७५० रुपये ॲडव्हान्स दिला. जीवघेण्या हल्ल्यानंतर मी खऱ्या अर्थानं शेतकऱ्यांचा 'हीरो' झालो. हाच माझ्या आयुष्यातील 'टर्निंग पॉइंट'. पुढे जोर्शीशी मतभेद झाले. संघटनेतून बाहेर पडलो. 'स्वाभिमानी'ची स्थापना केली. २००४ च्या विधानसभा निवडणुकीत मला शिरोळकरांनी स्वतः खर्च करून निवडून आणले. माझा हा विजय वैशिष्ट्यपूर्ण ठरला. मी आमदार झालो. आज खासदार आहे. शेवटी माझं देवाकडे एकच मागणं आहे. 'देवा, जर पुनर्जन्म असेल तर राजूला पुन्हा शेतकऱ्याच्या पोटीच जन्माला घाल!'

TEXMO INDUSTRIES
TEXMO
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
BCH स्टार्टर
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली,जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ,पटेल चौक,सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३९३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३४१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266
Shree Datta
Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

कांद्यावरील निर्यातबंदी रद्द

नवी दिल्ली, ता. १७ : केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यातबंदी उठवून किमान निर्यात दर ६०० डॉलर प्रतिटन केला आहे. अन्नविषयक विशेष मंत्रिगटाच्या आज झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या मंत्रिगटात अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्यासह संरक्षणमंत्री ए. के. अँटनी, गृहमंत्री पी. चिदंबरम यांचा समावेश होता.

सुमारे ५४ दिवसांची निर्यातबंदी उठविताना कांद्याचा निर्यातीचा नुकताच वाढवलेला एक हजार २०० डॉलरचा दर कमी केला आहे. देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव यामुळे स्थिर ठेवणे शक्य होणार असल्याने हा एकाच वेळी शेतकरी व ग्राहकांच्या हिताचा विचार असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

सरकारने दरात स्थिरता येण्यासाठी २० डिसेंबरला कांदा निर्यातीला स्थगिती

दिली होती. त्याचबरोबर किमान निर्यात दर एक हजार २०० डॉलर केला होता. मात्र, दोनच दिवसांनी २२ डिसेंबरला औपचारिक निर्यातबंदीची घोषणा केली होती. त्या पार्श्वभूमीवर ही निर्यातबंदी उठविताना मंत्रिगटाने निर्यातीच्या कांद्यासाठी जाहीर केलेले दरसुद्धा कमी केले आहेत. दरनिश्चिती सल्लागार समितीच्या २० डिसेंबरला झालेल्या बैठकीत किमान निर्यात दर हा ५२५ डॉलरवरून एक हजार २०० डॉलर प्रतिटन करण्यात आला होता. यामुळे दर आटोक्यात येतील अशी सरकारला अपेक्षा होती. मात्र, दर अपेक्षित प्रमाणात कमी न झाल्याने बाजारातील मागणी पाहता कांदा आयातीचा पर्याय सरकारला स्वीकारावा लागला होता. शिवाय, किमान निर्यात दरातील वाढीनंतर नाफेड, एनसीसीएफ आणि इतर शासकीय संस्थांनी निर्यातीसाठीचे ना हरकत प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया थांबविली होती. तसेच ज्यांना यापूर्वीच अशी ना हरकत प्रमाणपत्रे दिली आहेत, त्यांना नव्या म्हणजेच एक हजार २०० डॉलर प्रतिटन या दरानेच निर्यात करण्याचे बंधन घालण्यात आले होते.

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ साखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग		स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

साखर निर्यात अडकली लालफितीत

भाववाढीच्या बागुलबुवामुळे परवानगी न देण्यासाठी अन्न मंत्रालयावर दबाव

पुणे, ता. १३ : केंद्रीय व्यापार मंत्रालयाने खोडा घातल्याने पाच लाख टन साखरेची निर्यात लालफि तीत अडकली आहे. निर्यातीमुळे भाववाढ होऊन महागाईच्या निर्देशांकात वाढ होण्याची भीती दाखवून परवानगी देऊ नये, यासाठी अन्न मंत्रालयावर दबाव वाढला आहे. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी उच्चस्तरीय मंत्रिगटा स पत्राद्वारे निर्यातीबाबत सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचे आवाहन केले असून, येत्या दोन दिवसांत त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची चिन्हे आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर साखरेचे भाव चांगले असूनही त्याचा फ ायदा भारतास घेता आलेला नाही. स्थानिक बाजारात भाव कमी असल्याने शेतकऱ्यांना हमीभाव कसा द्यावा, याबाबत कारखान्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

यंदा देशभरातून पाच लाख टन साखर निर्यात करण्याचे ठरले. त्यापैकी राज्यातील कारखान्यांना दोन लाख ९० हजार टनांचा कोटा मिळाला. या संदर्भात अन्न मंत्रालयाने आठ जानेवारीस नियमावली जाहीर केली होती. त्यानुसार



राज्यातील सुमारे ५० कारखान्यांनी निर्यातीसंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता ३१ जानेवारीअखेर केली. मात्र, रिलीज ऑर्डरसाठी झालेल्या बैठकीत केंद्रीय व्यापार मंत्रालयास, तसेच गृहमंत्रालयाने यात खोडा घातला. साखरेची निर्यात झाल्यास महागाईच्या निर्देशांकावर विपरीत परिणाम होईल, अशी भीती यात व्यक्त करण्यात आली. त्यामुळे प्रक्रिया पूर्ण होऊनही साखरेची निर्यात अद्याप होऊ शकलेली नाही. याबाबत सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष शहाजी काकडे म्हणाले, ''कारखान्यांना मिळालेल्या कोट्याची आवश्यक कागदपत्रे दिल्यावर त्यास मंजुरी दिली जाईल असे सांगण्यात आले होते. पण ही फ इल सादर केल्यानंतर त्यास वाणिज्य मंत्रालयाने आक्षेप घेतल्यानंतर ती अडली आहे. अजूनही याबाबत निर्णय होत नसल्याने निर्यात रखडली आहे. स्थानिक बाजारात दर खाली आल्याने कारखान्यांचे अर्थशास्त्र बिघडले आहे. बुधवारी (ता. १६) याबाबत केंद्रीय अन्न व नागरी पुरवठा राज्यमंत्र्यांसोबत साखर संघाच्या प्रतिनिधींची बैठक झाली.''

याबाबत राज्यातील कारखान्यांमध्ये कमालीची अस्वस्थता असल्याने निर्यातीसाठी पुढाकार घेण्यासाठी खुद्द मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण मैदानात उतरले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार चव्हाण यांनी यासंदर्भात उच्चस्तरीय मंत्रिगटास दोनदा पत्र व्यवहार केला असून निर्यातबंदीस लागलेला ब्रेक त्वरित काढावा असे यात आवाहन केले आहे. निर्यातीमुळे महागाईच्या निर्देशांकावर परिणाम होत नसल्याचे आकडेवारीसह सिद्ध करण्यात आले आहे.

कांदा निर्यातबंदी उठेपर्यंत लिलाव होऊ देणार नाही

शेतकरी संघटना : नाशिक जिल्ह्यात 'रास्ता रोको'

नाशिकः कांदा निर्यात खुली करण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघटनेने आज कांद्याचे आगर असलेल्या पिंपळगाव बसवंत येथे आज दोन तास रास्ता रोको केला. कांदा निर्यातबंदी उठेपर्यंत जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये लिलाव होऊ देणार नाही. न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील, असा इशारा या वेळी देण्यात आला. खासदार राजू शेट्टी, आमदार पाशा पटेल, सदाभाऊ खोत, प्रदेशाध्यक्ष रवी देवांग यांच्या नेतृत्वाखाली येथील मुंबई-आग्रा महामार्गावर तब्बल दोन तास हे आंदोलन झाले. आंदोलनकर्ते माघार घेत नसल्याने श्री. शेट्टी, श्री. पटेल यांच्यासह सुमारे चारशे शेतकऱ्यांना अटक करून पोलिसांनी आंदोलन मोडले. आंदोलनामुळे ४०० क्विंटल कांद्याचा लिलाव होऊ शकला नाही.

शेतकरी संघटनेतर्फे कांदा निर्यातबंदी उठावी व रास्त भाव मिळावा या मागणीसाठी येथील बाजार समिती आवारात कांदा परिषद झाली. निर्यातबंदी खुली करण्याचे आश्वासन मिळेपर्यंत महामार्ग रोखायचा व जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांदा लिलाव होऊ द्यायचे नाहीत. तसेच व्यापाऱ्यांनी थेट शिवारात

कांदा खरेदी करावी, असे निर्णय परिषदेत झाले. त्यानंतर श्री. शेट्टी, श्री. पटेल यांच्यासह शेतकऱ्यांनी आंदोलनासाठी महामार्गाकडे धाव घेतली. कांद्याची निर्यातबंदी उठलीच पाहिजे, कोण म्हणतो देणार नाही, अशा घोषणांनी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी महामार्ग दणाणून सोडला. शेकडो शेतकरी एकाच वेळी येथील आगारासमोरील महामार्गावर ठिय्या आंदोलनाला बसल्याने वाहतूक थांबली.

पोलिस अधिकाऱ्यांनी आंदोलन मागे घेण्याची विनंती श्री. शेट्टी, श्री. पटेल यांना केली. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी यावे अथवा संबंधित मंत्र्यांनी निर्यातबंदी उठविण्याचे ठोस आश्वासन द्यावे, अशा मागणीवर ते आडून बसले. प्रांताधिकारी दत्तात्रय बोरुडे, तहसीलदार गणेश राठोड यांनी येऊनही आंदोलनकर्त्यांचे समाधान झाले नाही.

गेल्या वीस वर्षांच्या इतिहासात दोन तासांहून अधिक वेळ चाललेले हे आंदोलन ठरले. श्री. शेट्टी, श्री. पटेल यांच्या सहभागाने आंदोलनाची धार अधिकच तीव्र होती. भर उन्हात प्रदीर्घ काळ चाललेल्या या आंदोलनाचे वृत्त पालकमंत्री छगन भुजबळ, कृषिमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यापर्यंत पोचले. दूरध्वनीवरून कृषिमंत्री विखे-पाटील यांनी श्री. शेट्टी यांच्याशी संपर्क साधला. मात्र ठोस आश्वासन न मिळाल्याने त्यांनी आंदोलन सुरूच ठेवले. महामार्गावर नाशिक व मालेगावच्या दिशेने वाहनांच्या दुतर्फा रांगा लागल्या होत्या. आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी केल्याने पोलिसांनी श्री. शेट्टी, श्री. पटेल यांच्यासह शेतकऱ्यांना अटक करून आंदोलनकर्त्यांची मुस्कटदाबी केली. तासाभरानंतर या सर्वांची सुटका करण्यात आली.

अकिवाटमध्ये दूध संकलन केंद्रावर छापा

इचलकरंजी, : अन्न व औषध प्रशासन विभागाने अकिवाट (ता. शिरोळ) येथील एका दूध चिलिंग सेंटरवर छापा टाकून पाच हजार लिटर भेसळ दूध, भेसळीसाठी लागणारे केमिकल्स, दूध वाहतुकीसाठी वापरला जाणारा टँकर असा लाखो रुपयांचा माल जप्त केला. या प्रकरणी चिलिंग सेंटरचा मालक प्रदीप बाळासाहेब उळागड्डे (रा. अकिवाट) याला अटक करण्यात आली आहे. प्रदीप याच्यासह भाऊ प्रमोद आणि चार कामगारांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अन्न निरीक्षक योगेश हिंदुराव ढाणे यांनी कुरुंदवाड पोलिसांत तक्रार दिली आहे. या प्रकरणाचा तपास येथील इचलकरंजी गावभाग पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

अकिवाट येथील मे. शेतकरी दूध चिलिंग सेंटरवर दुधात भेसळ होत असल्याची माहिती या विभागाला मिळाली होती. गेले अनेक दिवस सुरू असलेल्या या प्रकारावर पाळत ठेवून काल छापा टाकण्यात आला. यावेळी भेसळीचे पाच हजार लिटर दूध, चार हजार रुपये किमतीची भेसळीसाठी वापरली जाणारी ५० किलो व्हे पावडर, युरिया, साखर, कॉस्टिक सोडा असे साहित्य मिळाले. याशिवाय या सेंटरबाहेर थांबलेल्या टँकरमध्येही दूध होते. या साहित्यासह टँकरही जप्त करण्यात आला. प्रमोद उळागड्डे याच्या मालकीचा हा टँकर आहे. टँकरमधील दोन कप्प्यात एकूण पाच हजार लिटर दूधसाठा असल्याचे आढळले. हे दूध विक्रीसाठी नेण्यात येणार होते. ते नष्ट करण्यात आले.

या चिलिंग सेंटरमध्ये कर्नाटकमधून मोठ्या प्रमाणात दूध संकलन होते. त्यात भेसळ करून हे दूध मुंबईला विक्रीसाठी पाठवले जात असल्याची माहिती तपासात उघड झाली. दुधाची डिग्री वाढवून ते बाजारात विकले जात असल्याचे कारवाईनंतर उघड झाले. अन्न व औषध प्रशासन विभागाने भेसळ दूध जप्त करून त्याचे नमुने तपासणीसाठी घेतले. उर्वरित दूध नष्ट करण्यात आले. या परिसरातील चार महिन्यातील ही दुसरी कारवाई असल्याचे या विभागाचे सहायक आयुक्त एन. ए. यादव यांनी सांगितले.

श्री. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई निरीक्षक वाय. एस. ढोणे, आर. बी. कसगीकर, डी. एन. शिर्के, पर्यवेक्षक एस. बी. जानकर, नमुना सहायक एस. व्ही. माने यांनी केली.

आपण न चुकता आपले प्रयत्न चालूच ठेवले पाहिजेत! या बैठकीनेही महागाई कमी होणार नसेल तर आपण पुढली बैठक बोलावू!!



महागाईबद्दल जनतेच्या भावना खूप तीव्र आहेत, त्यावर उपाय म्हणून कांदा, तेल, डाळी वैगरेंना जीवनावश्यक वस्तू समजणं सरकारनं सोडून द्यावं !!

तुंगमध्ये बाटली आडवी

तुंग (ता. मिरज) : येथे दारू, बीअरबारला परवाना देण्यावरून सुरू असलेल्या वादावर अखेर ग्रामसभेत महिलांच्या बाजूने निर्णय झाला. महिलांनी आपली नारी शक्तीची ताकद दाखवून दिली.

हनुमान मंदिरजवळ सरपंच सौ. सुनंदा गुरव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत बहुसंख्येने जमलेल्या महिलांनी दारू परवान्याला विरोध केला. परवान्याविषयी अर्जाचे वाचन ग्रामसेवक मच्छिंद्र झांबरे यांनी केले. माजी सरपंच सौ. शालन कापसे यांनी ग्रामस्वच्छता अभियानवेळी घेतलेल्या कोपरा सभेचा दाखला दिला. बीअरबारला परवाना मिळावा, म्हणून अर्ज केलेल्या ढाबे चालकाने अर्वाच्य शब्द वापरल्याने काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

माजी सैनिक महादेव गुरव यांच्या पत्नी सरपंच सौ. सुनंदा गुरव यांच्यावरच स्वतः दारू विकत असल्याचा आरोप ढाबेचालकाने केल्याने वातावरण गंभीर बनले. महिला संतप्त झाल्याने त्यांनी ग्रामसभेतून पुरुषांना हाकलून लावले. गावात कोणताही दारू परवाना देण्यात येऊ नये, अर्ज स्वीकारू नये, असा ठराव करण्यात आला.

दरम्यान, परवाना मागणीसाठी घेण्यात आलेल्या सह्या आमच्या नाहीत, असा खुलासा काही महिलांनी पुन्हा केला. परवाना मागणीवर असलेल्या साठपैकी प्रत्यक्षात सहा सातच महिला उपस्थित होत्या. त्यामुळे कोणतीही कल्पना न देता या सह्या घेतल्याचे निष्पन्न झाले. उपसरपंच प्रा. संजय वाईंगडे, सदस्य सौ. सुवर्णा दळवी, सौ. सुरेखा बिरनाळे, सौ. मीना चव्हाण, पोलिसपाटील सौ. श्रुती गुरव उपस्थित होते.

इस्लामपूर : येथील जय महाराष्ट्र विद्यार्थी सेनेतर्फे सौ. ज्योती तांदळे यांना मातोश्री सुभद्रादेवी डांगे आदर्श महिला सरपंच पुरस्काराने गौरवण्यात आले.

स्त्रीचा जन्म नाकारल्यास समतोल ढळेल

राजू शेट्टी : इस्लामपुरात कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

इस्लामपूर : स्त्री भ्रूणहत्या थांबली नाही तर भविष्यात युवकांना मुली मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागेल. स्त्रीचा जन्म नाकारल्यास समाजाचा समतोल ढासळेल, असे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

सुभद्रा डांगे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त येथील जय महाराष्ट्र विद्यार्थी सेनेतर्फे आयोजित कर्तृत्ववान महिलांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. संजय ढोबळे अध्यक्षस्थानी होते. सौ. शकुंतला पाटील, माई सायनाकर यांना आदर्श आई, प्रा. अरुणादेवी पाटील यांना आदर्श महिला, श्रीमती मंगल साळुंखे यांना आदर्श कर्मचारी, सौ. ज्योती तांदळे यांना आदर्श सरपंच व सौ. मंगल साळुंखे यांना आदर्श शिक्षिका पुरस्काराने गौरवण्यात आले.

खासदार शेट्टी म्हणाले, ''वाळवा तालुक्यातील दर हजारी मुलींचे घटते प्रमाण चिंताजनक आहे. ही स्थिती रोखावी लागेल. आजच्या मुली शेतकऱ्यांना डावलत आहेत. स्त्री भ्रूण हत्या सुरूच राहिली तर भविष्यात विवाहाचा प्रश्न गंभीर बनेल. स्त्री भ्रूण हत्या प्रकारात सुशिक्षितांचे प्रमाण जास्त असणे खेदाचे आहे. आज सर्वच क्षेत्रांत महिलांनी लौकिक प्रस्थापित केला आहे.''

निवृत्त प्राचार्य विश्वास सायनाकर, नगरसेवक विक्रम पाटील, संजय ढोबळे, सौ. शकुंतला पाटील, सरपंच सौ. ज्योती तांदळे, सौ. अरुणा रानगे

पान १२ वर

पीक विमा योजनेची नवी संकल्पना

खासदार राजू शेट्टी

गेल्या काही वर्षापासून होत असलेल्या जागतिक तापमानवाढीमुळे हवामानात मोठे फेरबदल होत आहेत. याचा अनेक क्षेत्रावर परिणाम होत असला तरी तो कृषी क्षेत्रावर विशेषत्वाने जाणवू लागला आहे. त्यामुळे देशात परंपरेने चालत आलेली पीकपध्दत धोक्यात आली आहे. या परिस्थितीत जागतिक पातळीवरील हवामानाचा विचार करता हिवाळा आणि उन्हाळा आणि पावसाळा असे तीन ऋतू असतात. परंतु, उष्णकटिबंधातील प्रदेशात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा असे तीन ऋतू असतात. ही परिस्थिती हजारो वर्षापासून कायम आहे. परंतु, अलिकडच्या काळात वाढत्या औद्योगिकरणामुळे हवेत कार्बन मोनॉक्साईड आणि कार्बन डॉयऑक्साईड हे वायू हे मोठ्या प्रमाणावर मिसळू लागले आहेत. कार्बनच्या ज्वलनात ऑक्सिजनचे ज्वलन मोठ्या प्रमाणावर वाढू लागले आहे. त्याच वेळी जंगलतोडीमुळे वनराई कमी होत चाललेली आहे. या साऱ्याचा परिणाम म्हणून सूर्यापासून निघणारे अतिनील किरणे थेट जमिनीवर आल्यामुळे ती भाजू लागली आहेत. त्याचे पर्यावसन तापमान वाढीत होत आहे. साहजिकच, या तापमानवाढीचे अनेक विपरित परिणाम समोर येत आहेत.ढगफुटीतून अचानक वृष्टी होऊन जमीन वाहून जाणे, चक्रीवादळे, बिगर मोसमी पाऊस यासारख्या समस्या सातत्याने निर्माण होत आहेत. त्याचबरोबर काही वेळा एखाद्या भागात अतिवृष्टी तर दुसऱ्या भागात दुष्काळ असे विर्पयास्त चित्रही दिसून येत आहे. त्यातत्या त्यात ऐन काढणीच्या वेळी पाऊस झाल्यामुळे पिके अडचणीत येत आहेत. या साऱ्यांमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या विवंचनेत सापडू लागला आहे.

सर्वसाधारणपणे आपल्याकडे मोसमाप्रमाणे खरीप आणि रब्बी अशी पीक पध्दती अस्तित्वात आहे. या पध्दतीप्रमाणे शेतकरी पिकांच्या लागवडीचे नियोजन करत असतो. त्या त्या हवामानाला अनुकूल ठरणारी पिके घेण्याचा प्रघात वर्षानुवर्षेकायम आहे. मात्र, निसर्ग चक्रातील बदलामुळे खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामातील पारंपारिक पिकांच्या, लागवडीचे वेळापत्रक कोलमडू लागले आहे. त्यातही अलिकडे पारंपारिक वाणांची लागवड फारशी होत नाही. वास्तविक या देशी पिकांच्या वाणांमध्ये रोगप्रतिकारशक्ती असते. त्यामुळे अशी पिके विशिष्ट

पान १७ वर ▸

पीक विमा योजनेची नवी संकल्पना

▶ पान १६ वरुन

हवामानामुळे किड आणि रोगाला सहजास-हजी बळी पडत नाहीत. या पार्श्वभूमीवर पिकांच्या संकरीत जाती मात्र कीड आणि रोगाला लवकर बळी पडतात, असे दिसून येते. विशेषतः अलिकडचे बदलते हवामान या वाणांना पेलवेना असे आले आहे. त्याम ुळे संकरित वाणांच्या लागवडीतून अपेक्षित उत्पादन मिळवणे कठिण जात आहे. शिवाय अलिकडे उत्पादन खर्च वाढल्यामुळे शेती करणे खर्चित ठरत आहे, विशेषतः द्राक्षासारख्या पिकासाठी मोठी भांडवली गुंतवणूक गरजेची ठरत आहे. अशा परिस्थितीत संबंधित शेतकऱ्याने मोठ्या मेहनतीने द्राक्ष बागेची जोपासना करायची आणि अचानक झालेल्या हवामानातील बदलामुळे ते पीकच हातचे जायचे हे दृश्य वारंवार पहायला मिळू लागले आहे.

हवामानातील बदल किंवा अवकाळी पाऊस यामुळे विविध पिकांचे मोठे नुकसान होते. वादळी पावसामुळे केळीच्या बागा उद्ध्वस्त होतात. तसेच द्राक्ष बागांचेही अतोनात नुकसान होते. वादळी पावसामुळे केळीच्या बागा उद्ध्वस्त होतात. तसेच द्राक्ष बागांचेही अतोनात नुकसान होते. डाळींब, बोर, आंबा यासारखी फळे तसेच भाजीपाला मोठ्या प्रमाणावर नष्ट होतो. वास्तविक या पिकांसाठी लागवडीचा तसेच अन्य खर्च मोठा असतो. अशा परिस्थितीत ती पिके हातची गेल्यास होणारे आर्थिक नुकसानही सहज भरून निघणारे नसते. काही वेळा तर या हानीमुळे शेतकऱ्यांना मोठा मानसिक धक्का बसतो.अशा वेळी शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देणे तसेच त्यांना दिलासा देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने शासन आपद्गस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई तसेच सानुग्रह अनुदान घोषित करते. मात्र, प्रत्यक्षात अशा सहकार्यातून शेतकरी पुन्हा उभे राहू शकत नाही. हे वास्तव आहे. कारण सरकारी पातळीवर दिली जाणारी मदत तटपुंजी असते. याशिवाय उंबरठा उत्पादन पध्दतीनुसार उत्पादम मोजण्याच्या रितीमुळे शेतकऱ्यांना पीक विम्याचाही फायदा होत नाही. एखाद्या गावात अतिवृष्टी तर दुसऱ्या गावात दुष्काळ अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीनंतर केंद्र आणि राज्य सरकार नुकसानभरपाईची घोषणा करते. पण अशी भरपाई बहुतांश आपद्ग्रस्त शेतकऱ्यांपर्यत पोहत नाही. मात्र सरकारच्या तिजोरीतून दोन ते चार हजार कोटी रूपये जातात. आयत्या वेळी कराव्या लागणाऱ्या अशा मदतीसाठी अंदाजपत्रकातील विकासकामांना कात्री लावावी लागते. असे चित्र वारंवार निर्माण होऊ लागले आहे. यावर मात कशी करायची हा खरा प्रश्न आहे. वास्तविक नैसर्गिक आ-पत्तीमुळे आर्थिक नुकसान सहन कराव्या लागणाऱ्या शेतकऱ्यांच्या भरीव मदतीसाठी मोठा निधी निर्माण केला जायला हवा. त्यासाठी अंदाजपत्रकात दरवर्षी विशिष्ट रकमेची तरतूद केली जायली हवी. अशा पध्दतीने तयार केलेला राष्ट्रीय पीक विमा कोष उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे. सरकारी पातळीवर सध्या सुरू असलेल्या पीक विमा योजनेबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली जात आहे. मात्र असे असताना प्रत्यक्षात या योजनेकडे आकर्षित होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या बरीच कमी आहे. याचे कारण ही योजना त्या त्या वेळी आवश्यक त्या प्रमाणात साहाय्यभूत ठरत नाही असा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळेच या पध्दतीतील व्यापक फेरबदल गरजेचे ठरत आहेत. शिवाय सध्याच्या पीक विमा योजनेत असणाऱ्या त्रुटीही दूर कराव्या लागणार आहेत. पावसाळ्यात वीज पडल्याने संर्पदंशामुळे किंवा औत तसेच कापणी करताना होणाऱ्या अपघातातून अनेक शेतकरी मृत्युमुखी पडत असतात. त्याचबरोबर बैलाने मारणे, विहिरीवरील मोटार सुरू करताना शॉक बसणे यासारख्या घटनांमुळे अनेक शेतकऱ्यांना जायबंदी व्ह-ावे लागते. अशा शेतकऱ्यांना सरकारकडून उतरवण्यात आलेल्या एक लाखांच्या अपघात विम्यापोटी नुकसानभरपाई मिळते. मात्र ती सुध्दा अत्यंत तुटपुंजी आहे. त्यामुळे ही पुढील भागात ही नुकसानभरपाईची रक्कम ५ लाखांपर्यंत वाढवण्याची नितांत आवश्यकता आहे. या साऱ्या बाबींचा सुधारित विमा योजनेत विचार व्हायला हवा. तरच शेतकऱ्यांना संकटप्रसंगी खऱ्या अर्थाने मदतीचा हात प्राप्त होऊ शकेल आणि ते संकटातून सावरू शकतील.

चिकूची लागवड अधिक फायदेशीर

महाराष्ट्रात चिकू हे एक महत्त्वाचे बागायत फळपीक आहे. चिकू हे वर्षभर उत्पन्न देणारे झाड असले तरी , सुरवातीच्या ७ - ८ वर्षात चिकूच्या बागसाठी मशागत, खत, पाणी यासाठी बराच खर्च करावा लागतो. परंतु एकदा लावलेली चिकूची बाग १२५ ते १५० वर्षापर्यंत टिकते आणि त्यासाठी फारसा परिश्रम करावा लागत नाही. सात ते आठ वर्षानंतर मिळणाऱ्या उत्पन्नाचा विचार केला तर इतर फळझाडापेक्षा चिकूची लागवड अधिक फायदेशीर आहे. तसेच चिकूचे भरपूर उपयोग आहेत. चिकूची गरांपासून हलवा, सरबत, मिक्स जॅम, ग्लुकोज पेक्टीन, आईस्क्रिम वगैरे बनवण्यासाठी उपयोग केले जातात. तसेच खोडातून व फळातून मिळणारा दुधाळ चीक चुईगंम बनविण्यासाठी चिकस तयार करताना लागतो व त्याचा उपयोग औषधे बनवण्यासाठी होतो. म्हणून चिकूंच्या फळाच्या वाढती मागणी लक्षात घेता चिकू उत्पादन करणे गरजेचे आहे. त्याची माहिती खाली दिलेली आहे. याचा फायदा शेतकऱ्यांनी करून घ्यावा.

१)जमिन व हवामानः उत्तम निचरा होणारी आणि बारामाही पाण्याची सोय असलेल्या जमिनीत चिकू लागवड करता येते. खडकाळ व दगडी जमिन सोडून सर्व प्रकारच्या जमिनीत चिकू वाढू शकते. साधारण जमिनीचा अंदाजे ६ ते ८ दरम्यान असणारे जमिनीत चिकू लागवड करा. चिकू उष्ण व दमट हवामानात चांगला येते. चिकूची वाढ चांगली होते. चिकू हे जागा सूर्यप्रकाश असलेल्या भागात जोमाने वाढते.

२) लागवड : लागवडीसाठी खिरणी रोपावरील कलम केलेल्या व जोड घट्ट असलेल्या निरोगी, जातीवंत, जोमदार वाढणारे, ५० ते ६० सेंमी उंचीची कलमे घ्यावीत. कालीपत्री, जातीवंत, जोमदार वाढणारे, ५० ते ६० मीटर उंचीची कलमे घ्यावीत. कालीपत्री, पिलीपत्री, क्रिकेट बॉल, को - १, को - २ या चिकूच्या महत्त्वाच्या जाती आहेत. लागवड पावसाळ्याच्या ,सुरवातीस किंवा अखेरीस करणे हिताचे ठरते. जेथे पाणी साठून राहण्याची शक्यता असते अशाठिकाणी कलमे ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात करावा.

पान १५ वर

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

चिकूची लागवड अधिक फायदेशीर

▸ पान १४ वरून

कलमाची लागवड शक्यतो सायंकाळी करावी. प्रत्येक खड्ड्यात लागवड केल्यानंतर थोडे पाणी द्यावेत. व झाडांवा आधार द्यावे. चिकू लागवडी पासून ३ वर्ष फळ, फुले खोडून टाकावेत. व चौथ्या वर्षापासून फळे द्यावेत.

३) खते व पाणी : जोमदार वाढीसाठी व अधिक उत्पादनाकरिता खताची मात्रा देणे जरूरीचे आहे. पहिल्यावर्षी प्रत्येक झाडास १ घमेले शेणखत, ३०० ग्रॅम युरीया, १ कि. सुपर फॉस्फेट, ३०० ग्रॅम पोटॅश, दोन हप्त्यामध्ये द्यावेत. एक लागणीवेळी व दुसरा हप्ता ६ महिन्याने द्यावा. खते बांगडी पध्द-तीने बुंद्यापासून अंतरावर द्यावीत, चिकू कलमांना सेंद्रिय खताचा वापर केल्याने झाडाची वाढ चांगली होते. व फळाचा आकारही मोठा असतो असा अनुभव आहे. चिकू बागेत, म ोकळ्या असलेल्या जागेत दोन किंवा तीन आंतरपिके, एकास वेळी, घेता येतात. चिकू लागवडीमध्ये काही वर्ष पपई केळी, पेरू या सारखे आंतरपिके घ्यावेत.

४) कीड व रोग : मुख्यतः खोड पोखरणारी आळी व पाने आणि कळ्या खाणारी अशी दिसून येतात. त्याकरीता खोड अळीसाठी खोडावरील फांदीला रॉके ल लावल्यास अळी गुदमरून मरतात. पाने खाणाऱ्या अळीला नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारी २० ग्रॅम कार्बारिल भुकटी (५० टक्के) १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मर व फळगळ, कुजणारी याला १ टक्के बोर्डो मिश्रणाच्या २ फवारणाऱ्या पावसाळ्याच्या अगोदर व नंतर अशा कराव्यात.

५) उत्पादन : चिकूच्या झाडाच्या ४ थ्या वर्षापासून उत्पादन येत असले तरी फ ायदेशीर उत्पादन सातव्या व आठव्या वर्षापासून मिळायला लागते. फळधारणे पासून फळे तयार होण्यास १५० ते १६० दिवस लागतात. फळ काढताना तयार पक्के झालेल्या फळांना चांगली निरखून पाहून काढाव्यात. दहा वर्षाच्या चिकूच्या झाडापासून एकाला १८०० ते २२०० फळे मिळतात. त्यानंतर जसे झाडाचे वय वाढते तसतशी फळांच्या संख्येत वाढ होत जाते. चिकूचे झाड १२५ ते १५० वर्षापर्यंत टिकून फळ देत राहते. वरील तंत्राचा वापर केल्यास शेतकऱ्यांना याचा निश्चितच मोठा आर्थिक फायदा होईल.

पोलिसपाटील गटातर्फे खासदार राजू शेट्टी यांचा सत्कार

▸ पान १३ वरून

बाजूच्या पट्ट्यात

औद्योगिक वसाहत निर्माण करा. त्याचा प्रारंभ कासेगाव येथे करा.''

प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांचे भाषण झाले. कृष्णा कारखान्याचे माजी संचालक सर्जेराव पाटील, चित्रपट अभिनेते विलास रकटे, यशवंत ग्लुकोजचे संचालक शहाजी पाटील, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, दि. बा. पाटील, पोपट पाटील उपस्थित होते. पोलिसपाटील बाळासाहेब पाटील यांनी स्वागत के ले. अशोक जाधव यांनी प्रास्ताविक केले. महेश पाटील यांनी आभार मानले.